डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा 37 वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न!

सर्वार्थाने संपन्न भारत देश घडविण्यासाठी कृषी क्षेत्रावर मोठी जबाबदारी :- राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

भारत देशाला जागतिक महासत्ताक बनवण्याकडे अग्रसित होत असताना कृषीप्रधान संस्कृती व सर्वाधिक लोकसंख्यांक लोकशाही जपण्याची सामूहिक जबाबदारी सर्वच क्षेत्राची असली तरी सर्वाधिक टक्का असणाऱ्या कृषी क्षेत्रावर आणि पर्यायाने कृषी पदवीधरांवर अधिक उमेद असल्याचे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल माननीय श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या 37 व्या दीक्षांत समारोहात अध्यक्षीय भाषण करताना दूरदृष्टी प्रणालीच्या माध्यमातून त्यांनी उपस्थित पदविकांक्षींसोबत संवाद साधला. आपल्या अतिशय मार्मिक संबोधनात त्यांनी देशातील कृषी विद्यापीठे आणि कृषी क्षेत्राचे भवितव्यावर सखोल प्रकाश टाकला व शाश्वत ग्रामविकासासाठी कृषी विज्ञान केंद्रानी मध्यवर्ती भूमिका बजवावी असे आवाहनही याप्रसंगी केले. कृषी क्षेत्रात रोजगार- स्वयंरोजगारसह राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध सेवेच्या संधी उपलब्ध असून कृषी विषयक शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या पदवीधरांमधून गावोगावी कृषी उद्योजक निर्माण होत शेती क्षेत्राला खऱ्या अर्थाने सर्वोत्तम दर्जा देण्याचे महत्तम कार्य साकारण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या "मॉडेल व्हिलेज" उपक्रमाची त्यांनी आपल्या मार्गदर्शनात प्रशंसा केली व अशा पद्धतीने राज्यात मोठ्या संख्येने आदर्श गावांची निर्मिती साध्य होईल असा आशावादही व्यक्त केला. कृषी विद्यापीठाचे दीक्षांत सभागृहात पदविकांक्षीच्या उत्साहपूर्ण उपस्थितीत संपन्न झालेल्या या दिमाखदार आणि शिस्तबद्ध कार्यक्रमाचे प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पदविकांक्षींसमोर दीक्षांत भाषण करताना महाराणा प्रताप कृषी तंत्रज्ञान विद्यापीठ उदयपूरचे माजी कुलगुरू डॉ. एन एस राठोड यांनी भविष्यातील जागतिक स्पर्धेचे गणितच विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले. भारतीय कृषी शिक्षण, भारतीय अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्राचे महत्त्व, भारतीय संस्कृती आणि कृषी क्षेत्र, कृषी तंत्रज्ञान, राज्यातील कृषी क्षेत्रांची सद्यस्थिती, ॲग्री स्टार्टअप, व अंतर्गत उपलब्ध असलेल्या संधी आदींवर अतिशय विस्ताराने बोलताना डॉ. राठोड यांनी उपस्थित युवा वर्गाला उज्वल भविष्य विषयी अवगत केले.

कार्यक्रमाचे स्वागत पर भाषण व अहवाल वाचन विद्यापीठाचे कुलगुरू माननीय डॉ. शरद गडाख यांनी केले. याप्रसंगी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू सोबतच विद्या परिषदेचे सन्माननीय सदस्य विचार मंचावर उपस्थित होते.

आज संपन्न झालेल्या या दीक्षांत समारंभात एकूण 4327 स्नातकांना निरनिराळ्या विषयात पदव्या प्रदान करण्यात आल्या. यंदा सुद्धा मुलींनी बाजी मारत कीटकशास्त्र विषयाची पदव्युत्तर विद्यार्थिनी कुमारी सोम्या शेफालीका दास हिनी सर्वाधिक पदकांची पदकांची कमाई केली. तर

मुलांमध्ये वैभव शिवशंकर समृतवार  यांनी सहा पदकांची कमाई केली. याप्रसंगी उत्कृष्ट शिक्षक उत्कृष्ट संशोधक उत्कृष्ट कर्मचारी वर्गाला पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

 तत्पूर्वी वाद्य वृंदाद्वारे मान्यवरांना दीक्षांत मिरवणुकी द्वारे कार्यक्रम स्थळी आगमन झाले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर कुलसचिव डॉ सुरेंद्र काळबांडे यांनी कुलपतीना दीक्षांत समारंभ सुरू करीत असल्याचे घोषित करण्यासंबंधी निवेदन केले. माननीय कुलपतींच्या मान्यतेने दीक्षांत समारंभाची सुरुवात झाली.  सुरुवातीला विद्यापीठ गीत,सरस्वती वंदना झाली. माननीय कुलगुरू डॉक्टर शरद गडाख यांच्या स्वागत पर भाषणानंतर पदवीधानास प्रारंभ झाला विविध गुणवत्ता व पारितोषिक धारण धारकांना त्यांची पदके व पारितोषिके मान्यवरांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आली. अरे सर्व नव पदवीकांक्षीना कुलपतींनी दीक्षांत उपदेश दिला. त्यानंतर मान्यवरांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले पसायदानानंतर कुलपतीने दीक्षांत समारंभ संपन्न झाल्याचे घोषित केले.




कृषि विद्यापीठ,अकोला
डॉ.पंजाबराव देशमुख
कृषि विद्यापीठ,अकोला
३७ वा


विद्यापीठ,अकोला
डॉ.पंजाबराव देशमुख
कृषि विद्यापीठ,अकोला
३७ वा
दीक्षांत समारंभ




दीक्षांत समारंभ


दीक्षांत समारंभ




डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
दीक्षांत समारंभ
37th Convocation: Dr. P.D.K.V., Akola


डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
कृषि महाविद्यालय अकोला
स्थापना-१९५५
College of Agriculture,Akola




दीक्षांत समारंभ


विद्यापीठ,अकोला
आणि इतरांचा वेळ कितीतरी ।
जाई व्यर्थचि गावी घरी ।
Convocation: Dr. P.D.K.V.,


दीक्षांत समारंभ

